**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक ०७.०२.२०२४**
**इतिवृत्त क्रमांक — ३५**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक ०७.०२.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त :- अध्यक्ष
२) उपआयुक्त ( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.



CamScanner

**संदर्भ :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः- सफाई - ०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.
(२) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३ दिनांक २३ मार्च २०२३.
(३) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३९५०/२०२३ दिनांक १० एप्रिल २०२३.
(४) कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्रमांकः-सफाई २०२३/प्र.क्र.४७/सआक दिनांक ७ ऑगष्ट २०२३ रोजीचे पत्र.
(५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः- बीसीसी - २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ -ब, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर,२०११.

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | विभागाने सादर केलेल्या सुचीनुसार कर्मचारी निवड समितीने प्रत्येक प्रस्तावातील सर्व दस्तांची छाननी व पडताळणी करुन करण्यात आलेली शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १. | **सौ.ज्योती अशोक तसांबड**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.सुमित अशोक तसांबड**<br>(मुलगा) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ७ मधील तरतुदीनुसार **श्री.सुमित अशोक तसांबड यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेता वर्ग-३ मधील पदाकरीता सामान्य प्रशासन विभागाने सेवाप्रवेश नियम तपासुन श्री.सुमित अशोक तसांबड यांचे नियुक्ती संदर्भात पुढील नियमोचीत कार्यवाही करणेस हरकत नाही. अशी शिफारस करण्यात येत आहे.** |
| २. | **कै.सरणपाल संतु चव्हाण**<br>मयत सफाई कामगार | **श्री.जसवंत सरणपाल चव्हाण**<br>(मुलगा) | दिनांक २२.११.२०२३ रोजीचे कर्मचारी निवड समितीचे निर्देशानुसार, केलेल्या पत्रव्यवहारानुसार भद्रकाली पोलिस स्टेशनकडील प्राप्त झालेल्या पत्रामध्ये श्री.जसवंत सरणपाल चव्हाण यांचेविरुध्द भादविक ३२४, ३२३,५०४,५०६,३४ मपोकाक १३५ गुन्हे नमुद असुन सदर खटला मा. न्यायालयात प्रलंबीत असलेबाबत नमुद आहेत. उक्त नमुद गुन्हयांचे स्वरुप विचारात घेता श्री. जसवंत सरणपाल चव्हाण यांना लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्कने मनपा सेवेत नियुक्ती देता येईल किंवा कसे ? याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा चार दिवसांचे आत अभिप्राय प्राप्त करुन घ्यावा.<br>**उपरोक्त नमुदची पुर्तता झालेनंतर प्रस्तुत प्रकरणी कर्मचारी निवड समितीवर निर्णय घेता येईल असे निवड समितीचे मत आहे.** |
| ३. | **कै.चुन्नु चंदर चंडालिया**<br>मयत सफाई कामगार | **श्री.हरिष चुन्नु चंडालिया**<br>(मुलगा) | दि.२२.११.२०२३ रोजीचे कर्मचारी निवड समितीचे निर्देशान्वये कै.चुन्नु चंदर चंडालिया,यांचे रिक्तपदी त्यांचा मुलगा श्री.हरिष चुन्नु चंडालिया यांचा नोकरी मिळणेबाबतचा अर्ज विहीत मुदतीत नसल्याने अर्ज निकाली काढणेत आला.<br>तथापि, श्री.हरिष चंडालिया यांनी दि.१८.१२.२०२३ रोजी अर्ज सादर करुन त्यांचे वडील कै. चुन्नु चंदर चंडालिया यांचे निधन झाले त्यावेळी त्यांचे वय १६/१७ होते. तसेच, लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काच्या नेमणुकीबाबत दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजी पारित झालेल्या शासन निर्णयातील तरतुद क्रमांक ४.२,५.४ व ५.५ मधील तरतुदीनुसार त्यांचे वडीलांचे रिक्तपदी नेमणुक होणेस विनंती केली आहे.<br>त्यानुसार, कै. चुन्नु चंदर चंडालिया यांचे निधनानंतर त्यांचे वारसांनी विहित मुदतीत अर्ज सादर करणेबाबत विभागाने कळविले होते किंवा कसे? याबाबत संबंधित विभागाचा अभिप्राय प्राप्त करुन घ्यावा. श्री.हरिष चुन्नु चंडालिया यांचे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र प्राप्त करुन घ्यावे. समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार कै. चन्नु चंदर चंडालिया यांचे रिक्तपदी श्री.हरिष चुन्नु चंडालिया यांना नियुक्ती देणेबाबत संपुर्ण वारसांचे सुधारीत संमतीपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदरच्या सुधारीत संमतीपत्रात चंदन चन्नु चंडालिया हा अ.पा.क. असलेबाबत नमुद करुन चंदन चंडालिया याचे वयाचा पुरावा सादर करणेबाबत संबंधितास कळविणेत यावे. तद्नंतर तरतुद क्रमांक ५.४ नुसार वारसदाराचा विहित मुदतीत अर्ज सादर करण्याची अट क्षमापित बाबत मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांची मान्यता होणे क्रमप्राप्त असल्याने याबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाने सात दिवसांत कार्यवाही करावी.<br>**उपरोक्त नमुदची पुर्तता झालेनंतर प्रस्तुत प्रकरणी कर्मचारी निवड समितीवर निर्णय घेता येईल असे निवड समितीचे मत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड) | (दत्तात्रेय पाथरुट) | (प्रतिभा मोरे) | (प्रशांत पाटील) | (लक्ष्मीकांत साताळकर) | (स्मिता झगडे) |
| संचालक, (घ. व्य. वि.) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | प्र. मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण ) | उपआयुक्त (प्रशासन) | अतिरिक्त आयुक्त |



CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | विभागाने सादर केलेल्या सुचीनुसार कर्मचारी निवड समितीने प्रत्येक प्रस्तावातील सर्व दस्तांची छाननी व पडताळणी करुन करण्यात आलेली शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ४. | **श्री.संतोष रामप्रसाद करोसे**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.कुणाल संतोष करोसे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.कुणाल संतोष करोसे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ५. | **श्रीम.अनिता प्रकाश पवार**<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | **श्री.अमन प्रकाश पवार**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः- सफाई - २०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ चे शासन निर्णयातील ३ (३.२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.अमन प्रकाश पवार, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ६. | **श्री.रामेरसिंग नकली चव्हाण**<br>सेवानिवृत्त सफाई कामगार | **श्री.रोहित रामेसिंग चव्हाण**<br>(मुलगा) | पोलीस उपायुक्त, विशेष शाखा, नाशिक शहर यांचेकडील दिनांक ०१/११/२०२३ रोजीचे चारीत्र पडताळणी अहवालात **श्री.रोहित रामेसिंग चव्हाण** यांचे विरुध्द भद्रकाली पोलिस स्टेशन येथे दाखल असलेली केस नं.३५३-२०१६ भादवि ३०७,३३६ ई. हा खटला नोंदणी क्र. १०४-२०२१ नुसार मा.न्यायालयाकडे प्रलंबीत असल्याचे नमुद आहे. सदर **केसबाबत सद्यस्थीतीची माहिती तथा खुलासा संबंधित पोलीस स्टेशनकडन प्राप्त करुन घ्यावा. माहिती प्राप्त झालेनंतर सदरचे प्रकरण पुढील कर्मचारी निवड समितीसमोर सादर करावे. तद्नंतर निर्णय घेणे योग्य होईल. असे समितीचे मत आहे.** |

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, मा.अध्यक्ष यांनी दिलेले निर्देशानुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

**(डॉ.आवेश पलोड )**
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(दत्तात्रय पाथरुट)**
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(प्रतिभा मोरे)**
**प्र. मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(प्रशांत पाटील)**
**उपआयुक्त (समाजकल्याण )**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(लक्ष्मीकांत साताळकर)**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(स्मिता झगडे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक